अर्धसाप्ताहिक

स्वातंत्र्य दिनाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक
अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

शनिवार, दि. 15 ऑगस्ट 2026 | वर्ष 12 वे | अंक 01 ला | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

## पदवीधर नोंदणी, एसआयआरसह संघटनात्मक कामांचा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाणांकडून आढावा

ब्रह्मपुरी/का.प्र.

भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत ब्रह्मपुरी येथे चंद्रपूर जिल्ह्यातील भाजपा पदाधिकारी व कार्यकर्त्यांची महत्त्वपूर्ण जिल्हा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. या बैठकीचे नियोजन ब्रम्हपुरी विधानसभा क्षेत्राचे माजी आम. प्रा.अतुल देशकर व चंद्रपूर जिल्हा ग्रामीणचे अध्यक्ष हरिषजी शर्मा यांच्या वतीने करण्यात आले




होते. यावेळी पक्षाचे वरिष्ठ नेते, खासदार, आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या उपस्थितीने बैठकीला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

आगामी काळातील संघटनात्मक आव्हाने, पदवीधर मतदार नोंदणी, राज्यभर सुरू असलेली SIR (Special Intensive Revision) प्रक्रिया तसेच पक्षाच्या विविध अभियानांच्या अनुषंगाने या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील पक्षाच्या संघटनात्मक कामाचा आढावा घेत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना आगामी काळासाठी मार्गदर्शन केले. यावेळी पदवीधर मतदार नोंदणी अभियानावर विशेष भर देण्यात आला. पात्र पदवीधर मतदारांची जास्तीत जास्त नोंदणी व्हावी, यासाठी कार्यकर्त्यांनी प्रत्येक भागात प्रत्यक्ष संपर्क वाढवून काम करण्याच्या सूचना प्रदेशाध्यक्षांनी दिल्या. बूथनिहाय नियोजन, पात्र मतदारांपर्यंत पोहोचणे आणि नोंदणी प्रक्रियेबाबत नागरिकांना आवश्यक मार्गदर्शन करणे यासाठी संघटनेच्या सर्व स्तरांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.त्याचबरोबर राज्यभर सुरू असलेल्या SIR प्रक्रियेचाही सविस्तर आढावा घेण्यात आला.

(उर्वरित पान क्र. ६ वर)

## ब्रम्हपुरी-आरमोरी राष्ट्रीय महामार्गावर मृत्यूचा सापळा..!

### रस्त्याला पडलेल्या भेगांकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे दुर्लक्ष

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी-आरमोरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३-डी हा ब्रम्हपुरीमार्गे नागपूर तसेच आरमोरीमार्गे गडचिरोलीला जोडणारा अत्यंत महत्त्वाचा आणि वर्दळीचा मार्ग आहे. या मार्गावर दररोज हजारो लहान-मोठी वाहने धावत असतात. मात्र, काही वर्षांपूर्वी कोट्यवधी रुपये खर्च करून सिमेंट काँक्रीटचा तयार करण्यात आलेला हा महामार्ग आता ठिकठिकाणी मोठ्या भेगांनी विदीर्ण झाला असून वाहनचालकांसाठी धोकादायक



ठरत आहे.

महामार्गावर अनेक ठिकाणी पडलेल्या भेगांमुळे वाहनचालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि लहान वाहनधारकांसाठी हा मार्ग जीवघेणा बनला आहे. अचानक समोर येणाऱ्या भेगांमुळे वाहनांचा तोल जाऊन किरकोळ अपघात घडत असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नागरिक व्यक्त करीत आहेत.

या महामार्गाची देखभाल आणि नियमित पाहणी करण्याची जबाबदारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची असताना संबंधित अधिकारी आणि अभियंते या मार्गावरून वारंवार प्रवास करूनही रस्त्याची दयनीय अवस्था त्यांच्या निदर्शनास कशी येत नाही, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

या मार्गावर यापूर्वीही अनेक गंभीर अपघात घडले असून अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तरीही प्रशासनाकडून रस्त्याच्या दुरुस्तीकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. काही वर्षांतच कोट्यवधी रुपयांच्या महामार्गाची झालेली ही अवस्था कामाच्या दर्जावरही प्रश्नचिन्ह निर्माण करणारी असल्याची चर्चा होत आहे.

महामार्गावरील सर्व भेगांची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी व कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.






## संपादकीय...

# तिजोरीची कसरत!

लाडकी बहीण योजनेची पडताळणी ३० एप्रिल रोजी पूर्ण झाली, तब्बल २ कोटी ४७ लाख अर्जदारांपैकी १ कोटी ६६ लाख महिला पात्र ठरल्या, तर सुमारे ८१ लाख अर्जदार अपात्र ठरले. म्हणजेच पडताळणीनंतर लाभार्थीची संख्या मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. तरीही पात्र महिलांना दरमहा आर्थिक लाभ देण्यासाठी सुमारे अडीच हजार कोटी रुपयांची आवश्यकता आहे. वर्षभराचा विचार केला तर ही रक्कम किती मोठी आहे, याचा अंदाज यावा. यंदाच्या अर्थसंकल्पात अनुसूचित जाती घटकासाठी या योजनेकरिता तीन हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यातूनच जुलै महिन्याच्या लाभासाठी ३१९.५३ कोटी रुपये वर्ग करण्यात आले आहेत.

सरकारच्या दृष्टीने लाभार्थी महिलांना वेळेवर पैसे मिळणे महत्त्वाचे आहे आणि ते रास्तही आहे. परंतु प्रश्न केवळ एका महिन्याच्या हप्त्याचा नाही. प्रश्न या योजनेच्या दीर्घकालीन आर्थिक शाश्वततेचा आहे. लोकप्रिय घोषणांच्या राजकारणात सरकारे अनेकदा तात्कालिक लाभाचा विचार करतात. मात्र, त्यासाठी लागणाऱ्या सातत्यपूर्ण निधीची व्यवस्था कुठून करायची, याचा विचार नंतर केला जातो. लाडकी बहीण योजनेबाबतही हीच चिंता व्यक्त होत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या निधीतून या योजनेसाठी रक्कम वळवावी लागणे हे त्याचेच निदर्शक मानावे लागेल. सामाजिक न्याय विभागाच्या निधीला स्वत:चे महत्त्व आहे. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, वसतिगृहे, विविध कल्याणकारी योजना, शिक्षण, कौशल्यविकास आणि सामाजिक उन्नतीसाठी हा निधी वापरला जातो. त्यामुळे एका कल्याणकारी योजनेसाठी दुसऱ्या सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या क्षेत्रातील निधीचा आधार घ्यावा लागणे हे आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने तपासण्यासारखे आहे.

सरकारने निधीचा वापर करताना काटकसरीचे उपाय योजावेत आणि मंजूर आराखड्यानुसार तो याच आर्थिक वर्षात खर्च होईल याची दक्षता घ्यावी, अशा सूचना दिल्या आहेत. खर्चानंतर अहवाल सादर करण्याचे निर्देशही आहेत. या प्रशासकीय सूचनांचे पालन झाले पाहिजेच; पण त्यापेक्षाही महत्त्वाचे म्हणजे निधीची मूळ तरतूदच पुरेशी आणि स्वतंत्र आहे का, हा प्रश्न आहे. रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर या निधीला विशेष राजकीय अर्थ प्राप्त झाला आहे. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाच्या नावाखाली दिली जाणारी मदत ही प्रत्यक्षात महिलांना स्वावलंबी बनविण्याचे साधन आहे की मतदारसंघ मजबूत करण्याचे राजकीय साधन, याचे उत्तर सरकारने आपल्या धोरणातून द्यायला हवे.

महिलांच्या खात्यात पैसे जमा करणे सोपे आहे. परंतु, त्या महिलांचे उत्पन्न वाढेल, रोजगार निर्माण होईल, त्यांना कौशल्य मिळेल आणि कुटुंबाची आर्थिक स्थिती कायमस्वरूपी सुधारेल, अशी व्यवस्था उभी करणे अधिक महत्त्वाचे आहे. रोख मदत ही संकटाच्या काळात उपयुक्त ठरू शकते. पण, ती कायमस्वरूपी आर्थिक सक्षमीकरणाची पर्यायी व्यवस्था होऊ शकत नाही. सरकारने या योजनेसोबत महिलांच्या रोजगारासाठी, स्वयंरोजगारासाठी आणि उद्योजकतेसाठी ठोस कार्यक्रम उभे केले तर या निधीचा परिणाम अधिक दीर्घकाळ टिकणारा ठरेल. पात्र महिलांना लाभ मिळायलाच हवा; परंतु सार्वजनिक निधीचा प्रत्येक रुपया योग्य लाभार्थ्यापर्यंत पोहोचणे तितकेच आवश्यक आहे. पुढील काळात वयाची ६५ वर्षे पूर्ण करणाऱ्या महिला अपात्र ठरणार असल्याने लाभार्थीची संख्या बदलत राहणार आहे. त्यामुळे योजनेच्या आर्थिक नियोजनासाठी सरकारने पारदर्शक आणि दीर्घकालीन आराखडा जाहीर करणे गरजेचे आहे.

लाडकी बहीण योजना बंद करावी, असा या चर्चेचा अर्थ नाही. महिलांना थेट आर्थिक मदत देण्याचा उद्देश सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचा आहे. परंतु लोककल्याणाच्या नावाखाली आर्थिक शिस्त बाजूला सारणेही योग्य ठरणार नाही. एका हाताने लाभ देताना दुसऱ्या हातातील सामाजिक न्यायाच्या निधीला कात्री लावण्याची वेळ येऊ नये. राज्याच्या महसुलात वाढ कशी करणार, अनुत्पादक खर्च कुठे कमी करणार, कर्जाचा बोजा किती वाढणार आणि अशा योजनांसाठी पुढील पाच-दहा वर्षांचा निधी कुठून येणार, याची उत्तरे सरकारने द्यायला हवीत.

# साहित्य वारसा जपण्यासाठी कविसंमेलनांची गरज

## 'कविता पावसाच्या' कार्यक्रमात अशोक भैया यांचे प्रतिपादन

ब्रम्हपुरी/का.प्र.

'आविष्कार साहित्य मंच, ब्रम्हपुरी' द्वारे आयोजित 'कविता पावसाच्या' या विशेष




काव्यमैफलीचा सोहळा रविवारी अत्यंत उत्साहात आणि आनंददायी वातावरणात पार पडला. श्रावणाच्या सरींसोबतच शब्दांच्या पावसाचा सुंदर अनुभव या कार्यक्रमाच्या माध्यमातून रसिक श्रोत्यांना घेता आला. कार्यक्रमाचे उद्घाटक अशोक भैया यांनी आपल्या भाषणात आविष्कार साहित्य मंचाच्या कार्याचा गौरव करत आविष्कार साहित्य मंच, ब्रम्हपुरी हे या परिसरात साहित्यिक वारसा जिवंत ठेवण्याचे अतिशय सुंदर आणि कौतुकास्पद कार्य करीत आहे. शहरात साहित्य वारसा जपण्यासाठी अशा कविसंमेलन व वैचारिक कार्यक्रमाची आवश्यकता आहे ,असे प्रतिपादन त्यांनी उद्घाटनीय भाषणात केले.

संमेलनाध्यक्ष नोमेश मेश्रामांनी अध्यक्षीय भाषणात कवितेच्या भावविश्वावर प्रकाश टाकला. 'कविता हा मानवी भावनांचा सुंदर आविष्कार असतो आणि त्यातही पावसावर कविता लिहिणे व सादर करणे हा प्रत्येक कवीचा अतिशय आवडता विषय असतो,' असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर आणि कवी डॉ धनराज खानोरकर यांनी यावेळी उपस्थित कवी व श्रोत्यांशी संवाद साधत आविष्कारच्या या यशस्वी आयोजनासाठी संपूर्ण आविष्कार टीमचे अभिनंदन केले.

या काव्यसंमेलनात निमंत्रित कवींनी एकाहून एक सरस आणि आशयघन कविता सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. यात स्वप्नील उके, रोहित दोड, प्रशांत राऊत, राजेंद्र सोनटक्के, श्वेता निकुरे, गजानन माद्यस्वार, स्नेहा शेवाळकर, रश्मी देवगडे, डॉ. चंद्रकांत लेनगुरे, डॉ. रामेश्वर राठोड, रमेश बुरबुरे, विजय भगत, अर्जुमन शेख, तुळशीराम अंदिरवाडे, नेहा उमेश बन्सोड, नरेंद्र गंधारे, नागसेन सहारे, अंजू येवले, राहुल दहिवले, भारती लखमापुरे, रविंद्र चौधरी, विनोद गहाणे, सुरेश सुरजुसे, अनेका क्षीरसागर, सतू भांडेकर, सोनाली कोसे, विनायक लिंगायत, प्रभाकर दुर्गे इत्यादी निमंत्रित कवीं सहभागी झाले. पावसाच्या विविध रूपांचे, भावनांचे आणि निसर्गाचे विलोभनीय वर्णन कवींनी आपल्या रचनांमधून साकारले.

संपूर्ण कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्धरीत्या आणि नियोजित वेळेत पूर्ण झाला. या कार्यक्रमाचे नेटके आणि बहारदार सूत्रसंचालन वर्षा चौधरी यांनी केले. संमेलनात परिसरातील साहित्यप्रेमी व रसिकांची मोठी उपस्थिती लाभली होती. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी आविष्कार साहित्य मंचाचे अध्यक्ष मंगेश जनबंधू, सचिव गौतम राऊत, ललित बोरकर तसेच मंजुषा साखरकर, भिमानंद मेश्राम, भाविक सुखदेवे, छाया जांभुळे, डॉ. धनराज खानोरकर, ज्योती नवघरे, शशी मदनकर, इंदु मुळे, सोनाली सहारे, चैतन्य मातुरकर, कल्पना सूर्यवंशी गेडाम, मंगेश गोवर्धन, अशोक शामकुळे आणि हिराकांत निहाटे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# अल्पवयीन चालकांविरूध्द धडक कारवाई

ब्रह्मपुरी /का.प्र.

शहर व परिसरातील रस्ते वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि अपघातमुक्त करण्यासाठी ब्रह्मपुरी पोलीस ठाण्याने अत्यंत स्तुत्य आणि कौतुकास्पद पाऊल उचलले आहे. दिनांक ७ ऑगस्ट २०२६ पासून संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात अल्पवयीन वाहन चालकांविरुद्ध विशेष मोहीम तीव्र करण्यात आली. मोहिमेच्या पहिल्याच दिवशी ब्रम्हपुरीत कारवाई करत तब्बल १८ अल्पवयीन मुलांना वाहनांसह ताब्यात घेतले.

ब्रह्मपुरीचे पोलीस निरीक्षक प्रमोद बानबले यांनी अत्यंत जबाबदार आणि संवेदनशील अधिकाऱ्याची भूमिका बजावत सर्व पालकांना पोलीस ठाण्यात बोलावून समज दिली.

ठाणेदार प्रमोद बानबले यांच्या कुशल आणि मार्गदर्शनपर नेतृत्वाखाली ब्रह्मपुरी पोलीस ठाण्याच्या अंमलदारांनी अत्यंत चोख कामगिरी बजावली. या मोहिमेत पोलीस अंमलदार संजय गेडेकर, प्रशांत दरेकर, प्रवीण बोंदाडे, प्रफुल जुनघरे आणि चंदू कुरसंगे यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून धाडसी कारवाई केली.

### प्रा. बालाजी दमकोंडवार यांना पीएच.डी. प्रदान

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील ने.हि. महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. बालाजी दमकोंडवार यांनी मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथून समाजशास्त्र या विषयात डॉ. सुरेश धनवडे यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त केली आहे. त्यांच्या संशोधन प्रबंधाचा विषय 'महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन – विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा' असा होता.

## विनोदिनी

पप्पू के घर के दरवाज़े के ताले की चाबी खो गई... बहुत ढुंधनें पर भी नहीं मिली... तो उसने दरवाजाही निकाला और कंधे पे रख के बाज़ार मे ठीक करने गया...

एक आदमी ने पूछा : ओ भाई, क्या दरवाज़ा बेचना है ???

पप्पू : नही, ताला खुलवाना है, चाबी गुम हो गई है...

जोक अभी आगे है :

हँसो मत !!!

आदमी पप्पू से : अगर घर मे चोर घुस गये तो ???

पप्पू : अंदर कैसे जाएगा ??? दरवाज़ा तो मेरे पास है..!! और चाबी भी नहीं है...!!!

# तोरगांव परिसरातून जाणारा कोट्यावधीचा गोसेखुर्द उजवा कालवा वर्षभरातच भेगाळला

## कंत्राटदार-अभियंत्यांना आम. वडेट्टीवारांनी धरले धारेवर

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील तोरगाव परिसरातून जाणाऱ्या गोसेखुर्द उजव्या कालव्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे कोट्यवधी रुपयांचा सार्वजनिक निधी वाया जात असल्याचे चित्र समोर आले आहे. अवघ्या वर्षभरातच कालव्याला अनेक ठिकाणी भेगा पडल्या असून काही ठिकाणी बांधकाम खचले आहे. त्यामुळे भर हंगामात शेतकऱ्यांच्या शेतापर्यंत सिंचनाचे पाणी पोहोचण्यास विलंब होत असून शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.



या पार्श्वभूमीवर विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते तथा आमदार विजय वडेट्टीवार यांनी घटनास्थळी भेट देऊन कालव्याची पाहणी केली. पाहणीदरम्यान निकृष्ट दर्जाचे बांधकाम उघडकीस आल्यानंतर त्यांनी संबंधित कंत्राटदार आणि सिंचन विभागातील अभियंत्यांना चांगलेच धारेवर धरले. दोन वर्षापासून गोसेखुर्द उजव्या कालव्यावरील 'क्रिटिकल पॅचेस'च्या बांधकामासाठी एम.के.एस., बी आयपीएल, सरला या कंपनीला २३५ कोटींचे कंत्राट देण्यात आले होते. मात्र काम पूर्ण करण्याची मुदत संपूनही आतापर्यंत अवघे १५ टक्के कामच पूर्ण झाले आहे. त्यातही झालेल्या कामाचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचे पाहणीत स्पष्ट झाल्याने संपूर्ण प्रकरणावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कामाच्या संथ गतीमुळे आणि पाणी वेळेवर न मिळाल्याने यापूर्वी संतप्त शेतकऱ्यांनी कार्यकारी संचालकांच्या कार्यालयावर धडक देत आंदोलन केले होते. तरीही प्रशासनाने ठोस पावले न उचलल्याने शेतकऱ्यांचा रोष अधिकच वाढला आहे.

यावेळी कार्यकारी अभियंता सुहास मोरे यांच्यासह सिंचन विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. वडेट्टीवार यांनी अधिकाऱ्यांकडून कामाचा सविस्तर आढावा घेत तातडीने दुरुस्तीची कामे पूर्ण करून शेतकऱ्यांना अखंड पाणीपुरवठा करण्याचे निर्देश दिले. गोसेखुर्दसारख्या महत्त्वाकांक्षी सिंचन प्रकल्पात निकृष्ट दर्जाचे काम, विलंब आणि प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हजारो शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. असेही विधिमंडळ पक्षनेते आ. विजय वडेट्टीवार म्हणाले. कालवा पाहणीच्या वेळेस काँग्रेस तालुका अध्यक्ष खेमराज तिडके, उपनगराध्यक्ष डॉ. नितीन उराडे, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमुरकर यांचेसह काँग्रेस पदाधिकारी व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी सर्व योजनांचा लाभ घेऊन व्यक्तिमत्त्व घडवावे – प्राचार्य डॉ. शेकोकर

ब्रह्मपुरी/का.प्र.

'आपले महाविद्यालय हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रेरणेने व कर्मयोगी मदनगोपालजी भैया यांच्या दातृत्वातून उभे झाले आहे. आज येथे तज्ज्ञ प्राध्यापक व विविध योजना उपलब्ध आहेत. समृध्द ग्रंथालय व या विविध दालनांतील उपलब्ध सोयीचा प्रत्येक विद्यार्थ्यांनी योग्य लाभ घेवून आपले व्यक्तिमत्व घडवावे' असे विवेचन प्राचार्य डॉ सुभाष शेकोकरांनी केले. ते नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालयात बी.ए.प्रथम वर्ष विद्यार्थी उजळणी वर्ग कार्यक्रमात अध्यक्षपदावरुन बोलत होते.

विचारपीठावर डॉ राजेंद्र डांगे, डॉ धनराज खानोरकर, डॉ असलम शेख, डॉ वर्षा चंदनशिवे, डॉ राजू आदे, डॉ बालाजी दमकोंडवार, प्रा सोनाली पारधी इत्यादी विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी सर्वांनी आपल्या विषयाची व योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ.पद्माकर वानखडे, डॉ प्रकाश वट्टी, प्रा संजू मेश्रामांनीही विचार मांडले. डॉ युवराज मेश्राम, डॉ सुनिल चौधरी, मोरेश्वर हटवार उपस्थित होते.

संचालन डॉ वट्टी यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

# एसटीमध्ये विसरलेली पैशांची पर्स वृध्द दाम्पत्याला परत

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या एका ज्येष्ठ दांपत्याची गहाळ झालेली ४ हजार रुपयांची रोकड असलेली पर्स चालकाने व वाहकाने प्रामाणिकपणे आणि कर्तव्यनिष्ठेने शोधून परत केली. ब्रह्मपुरी आगाराच्या कर्मचाऱ्यांनी दाखवलेल्या या प्रामाणिकतेमुळे जनमानसात एसटी महामंडळाची प्रतिमा अधिक उजळली आहे.

ब्रह्मपुरी तालुक्यातील आवळगाव येथील रहिवासी बाबुरावजी भोयर व पत्नी ताराबाई हे वैद्यकीय उपचारासाठी आवळगाव वरून ब्रह्मपुरी येथे येण्यासाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये बसले होते. प्रवासादरम्यान त्यांच्याजवळील ४,००० रुपये असलेली पर्स वाटेत कुठेतरी गहाळ झाली.

सदर बसमध्ये ब्रह्मपुरी आगाराचे चालक सी. टी. आत्राम व वाहक आर. आर. बोळेवार हे कर्तव्यावर होते. पर्स गहाळ झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर, दोन्ही कर्मचाऱ्यांनी तात्काळ शोध घेऊन अत्यंत कर्तव्यनिष्ठेने ती पर्स सुरक्षितपणे शोधून काढली. त्यानंतर ब्रह्मपुरी बस स्थानकावर पोहोचताच संबंधित प्रवाशाला ती ४ हजार रुपयांची पर्स जशीच्या तशी सुपूर्द केली.

# रुग्णांच्या गैरसोयींबाबत भाजपचे वैद्यकीय अधिक्षकांना निवेदन

ब्रम्हपुरी/का.प्र.

जिल्हा ग्रामीण रुग्णालयातील रुग्णांना आवश्यक औषधे नियमित उपलब्ध करून देण्यात यावीत, तसेच औषध वाटप केंद्रातील गैरसोयी दूर कराव्यात, या मागणीसाठी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाच्या वतीने वैद्यकीय अधीक्षकांना निवेदन देण्यात आले.



औषध वाटप केंद्रात रुग्णांच्या लांबच लांब रांगा लागत असतानाही संबंधित कर्मचारी वेळेवर उपलब्ध नसल्याने रुग्णांना ताटकळत उभे राहावे लागत असल्याची बाब निवेदनातून निदर्शनास आणून देण्यात आली. तसेच रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांशी काही कर्मचाऱ्यांकडून अयोग्य पद्धतीने वर्तन केले जात असल्याच्या तक्रारीही मांडण्यात आल्या.

रुग्णांच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्यास लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजप युवा मोर्चाच्या वतीने देण्यात आला. निवेदन देताना भाजप युवा मोर्चा अध्यक्ष अमित रोकडे ,उपाध्यक्ष बंटी येरावार, अक्षय झुरमुरे, भरत सावकार, विवेक गरफडे, सचिव निखिल प्रधान, कृष्णा मेहेर, अखिलेश नागपूरकर, कोषाध्यक्ष रोशन कावळे, सदस्य शुभम बोरसरे, दीपक कावळे, यश वाघाडे व अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# एलएमबी पब्लिक स्कुलमध्ये पालक परिचय मेळावा उत्साहात संपन्न




ब्रम्हपुरी/का.प्र.

एल. एम.बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे प्री-स्कुलच्या पालकांसाठी Orientation -cum parents meet आयोजित करण्यात आली होता. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेची दृष्टी आणि कार्यपद्धती पालकांसमोर मांडण्यात आली.

या प्रसंगी विद्यार्थ्यांचा Holistic growth of every child, Development of cognitive, language & creative skills, Nurturing social, Emotional & communication skills, Building Early Literacy, Numeracy & school Readiness, Strengthening Parent-school Partnership, Laying a Strong Academic Foundation. पालकांनीही आपल्या सूचना व शंका व्यवस्थापनाकडे तत्काल स्वरुपात सादर करुन कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा प्रशासनाने सर्व पालकांचे आभार मानले.

यावेळी शाळेच्या संचालिका आशिता भैय्या मॅम म्हणाल्या 'पालक आणि शाळेचा संवाद हा मुलांच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत महत्वाचा आहे. आम्ही पालकांच्या सूचनांचा नक्कीच विचार करु'. बैठकीसाठी मोठया संख्येने पालक उपस्थित होते. आणि त्यांनी चर्चेत सक्रिय सहभाग नोंदविला त्याचप्रमाणे या चर्चेमध्ये मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, तसेच उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका यांनी सक्रिय सहभाग दर्शविला.

# ब्रम्हपुरी नगर पालिकेच्या ५० लाखांच्या निविदा प्रक्रियेत मोठा घोळ!

## कामाचे ७ तुकडे करून 'पेपरी टेंडर'चा बनाव, जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी नगर परिषदेमार्फत रस्ता अनुदान निधीअंतर्गत राबविण्यात येत असलेल्या विकासकामांच्या निविदा प्रक्रियेत पारदर्शकता व नियमांची पायमल्ली झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. तब्बल ५० लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या विकासकामांचे मुद्दाम ७ तुकडे करून 'पेपर टेंडर'च्या माध्यमातून मर्जीतील कंत्राटदाराला काम देण्याचा बनाव रचल्याचा खळबळजनक दावा नगरसेवक मनोज भुपाल यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची जिल्हास्तरीय स्वतंत्र चौकशी समितीमार्फत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी थेट चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

नगरसेवक मनोज भुपाल यांनी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना दिलेल्या निवेदनात नगर परिषदेच्या भोंगळ कारभारावर कडक ताशेरे ओढले आहेत. निविदा प्रक्रियेत स्पर्धात्मकता आणि पारदर्शकता जपली जावी, हा मूलभूत नियम असताना, ब्रम्हपुरी नगर परिषदेने स्थानिक पातळीवर योग्य प्रसिद्धी न देता अवघ्या एकाच जिल्हास्तरीय वृत्तपत्रात (खालसा संदेश) जाहिरात देऊन प्रक्रिया उरकल्याचे निदर्शनास आले आहे. इतकेच नव्हे तर नगर परिषदेच्या नोटीस बोर्डवरही यासंबंधीची सूचना लावण्यात आली नाही.

नियमानुसार मोठ्या रकमेच्या कामांची ई-निविदा प्रक्रिया राबवणे बंधनकारक असताना, ५० लाख रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या कामाचे जाणीवपूर्वक ७ लहान तुकडे करून 'पेपरी टेंडर' पद्धत वापरली गेली. स्थानिक पात्र कंत्राटदारांना माहितीच मिळू नये आणि एखाद्या ठराविक मर्जीतील कंत्राटदारालाच आर्थिक फायदा व्हावा, यासाठी ही संपूर्ण निविदा प्रक्रिया प्रभावित करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. निविदेची जाहिरात कोणत्या अटींच्या आधारे आणि कोणत्या वृत्तपत्रात देण्यात आली? याची माहिती लपवून नियमांचे सर्रास उल्लंघन करण्यात आले आहे.

सदर प्रकरणाची चौकशी नगर परिषद स्तरावर न करता जिल्हास्तरीय स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी समितीमार्फत करण्यात यावी, अशी ठाम मागणी नगरसेवक भुपाल यांनी केली आहे. चौकशीदरम्यान निविदेची मूळ फाईल, तांत्रिक व आर्थिक निविदा तुलनात्मक पत्रक आणि मंजुरी आदेशांची सखोल तपासणी करण्याची विनंती करण्यात आली आहे. जर या निविदा प्रक्रियेत नियमांचे उल्लंघन झाल्याचे सिद्ध झाले, तर संबंधित नियमबाह्य निविदा तात्काळ रद्द करून नव्याने पारदर्शक पद्धतीने प्रक्रिया राबवण्यात यावी, तसेच जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय व कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी आक्रमक भूमिका नगरसेवक मनोज भुपाल यांनी घेतली आहे. या तक्रारीमुळे नगर परिषदेच्या वर्तुळात आणि स्थानिक कंत्राटदारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

## विद्यार्थी प्रतीक लांजेवारच्या प्रामाणिकपणाचे सर्वत्र कौतुक

### पिशवीत सापडलेला मोबाईल, रोख रक्कम व कागदपत्रे प्राचार्यांकडे केले सुपूर्द



ब्रह्मपुरी/का.प्र.

रस्त्यात सापडलेली हजारो रुपयांची रोकड, मोबाईल व अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे असलेली पिशवी न आपल्या स्वत: कडे ठेवण्याच्या मोहात न पडता थेट प्राचार्यांकडे सुपूर्द करून लोकमान्य टिळक जुनिअर कॉलेजच्या प्रतीक लांजेवार या विद्यार्थ्याने आपल्या इमानदारीचा आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळच्या सुमारास शिक्षक गौतम खोब्रागडे हे ब्रह्मपुरी वरून अ-हेरनवरगाव येथे आपल्या शेतावर जात होते. यादरम्यान त्यांच्याजवळील एक प्लास्टिकची पिशवी अनावधानाने रस्त्यात खाली पडली. शेतावर पोहोचल्यानंतर फोन करण्यासाठी खिशात हात टाकला असता पिशवी गहाळ झाल्याचे खोब्रागडे यांच्या लक्षात आले. दरम्यान, पिंपळगाव भोसले येथून ब्रह्मपुरी येथील 'लोकमान्य टिळक जुनिअर कॉलेज'मध्ये इयत्ता ११ वीत शिकणारा विद्यार्थी प्रतीक मधुकर लांजेवार हा नेहमीप्रमाणे कॉलेजला जात असताना त्याला रस्त्यावर ती प्लास्टिकची पिशवी सापडली. पिशवी उघडून पाहिली असता त्यात एक मोबाईल, हजारो रुपयांची रोकड आणि अत्यंत महत्त्वाची कागदपत्रे असल्याचे त्याच्या निदर्शनास आले.

रक्कम पाहूनही प्रतीकच्या मनात कोणताही स्वार्थ निर्माण झाला नाही. त्याने तत्परतेने ती पिशवी तशीच सुरक्षित ठेवून कॉलेज गाठले आणि कॉलेजचे प्राचार्य यांच्याकडे सुपूर्द केली. दुसरीकडे, पिशवी हरवल्यामुळे चिंतेत असलेल्या शिक्षक गौतम खोब्रागडे यांनी दुसऱ्याच्या मोबाईलवरून आपल्या हरवलेल्या क्रमांकावर कॉल केला. प्राचार्यांनी तो कॉल स्वीकारून खोब्रागडे यांना तात्काळ कॉलेजमध्ये बोलावून घेतले आणि त्यांची पिशवी सर्व वस्तूंनिशी सुरक्षितपणे त्यांच्या स्वाधीन केली.

विद्यालयातील सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत खोब्रागडे यांनी प्रतीकच्या इमानदारीचा आदर करत त्याला १,००० रुपयांचे रोख बक्षीस देऊन गौरविले.

❀❀❀❀❀❀❀

## खिस्तानंदच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परिक्षेत यश

ब्रम्हपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे अंतर्गत घेण्यात आलेल्या वर्ग ४थी व ७वी च्या





शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये स्थानिक खिस्तानंद स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केलेले आहे.

प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत वर्ग ४ची विद्यार्थिनी अर्णवी आशिषकुमार कोसे हिने सर्वाधिक ७१.१४ टक्के गुण प्राप्त केले. तसेच अथांग अवतळे, हंसिका रामटेके, मनन सोनकुसरे, विहान ठाकूर, मिथीला गजभिये, विहान कोसे, सावी सिल्व्हेरी, सुर्वी मिसार तर उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत वर्ग ७वी चा विद्यार्थी सुमित अमोल खोब्रागडे याने सर्वाधिक ५९.७३ टक्के गुण प्राप्त केले तसेच आर्या उईके, आरुषी नागपुरे हे सर्व विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्र झालेले आहेत. विद्यालयातून बहुसंख्य विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीची परिक्षा दिलेली होती. त्यामध्ये सदर विद्यार्थी पात्र झालेले आहेत.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल विद्यालयाचे व्यवस्थापक फादर शिबू, मुख्याध्यापक फादर बिनु थॉमस, उपमुख्याध्यापिका सिस्टर अंजली तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कौतूक केलेले आहे.

## एसटीच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

ब्रह्मपुरी/का.प्र.

रस्त्यावरील दुभाजक (डिव्हायडर) ओलांडताना एसटी बस आणि दुचाकीमध्ये झालेल्या भीषण अपघातात ६५ वर्षीय दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. हा अपघात ब्रह्मपुरी तालुक्यातील किन्ही गावाजवळ, ब्रह्मपुरी-गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावर दि. ११ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १:३० वाजताच्या सुमारास घडला. कचरू शंकर अवसरे (वय ६५, रा. मांगली) असे मृत व्यक्तीचे नाव आहे.

गावकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, मांगली येथील रहिवासी कचरू अवसरे हे आज दुपारी काही कामानिमित्त किन्ही गावात गेले होते. गावालगतच्या राष्ट्रीय महामार्गावरील दुभाजक पार करत होते. मात्र, रस्ता ओलांडताना त्यांनी दोन्ही बाजूने येणाऱ्या वाहनांकडे लक्ष न देता आपली दुचाकी थेट दुभाजकाकडे वळवली. त्याच वेळी, गडचिरोलीकडून ब्रह्मपुरीकडे भरधाव येत असलेल्या बसने (क्रमांक एम.एच. १४ एम. एच. ०३५२) अचानक समोर आलेल्या दुचाकीला जोरदार धडक दिली. यात कचरू अवसरे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

## वसतीगृहात जागतिक आदिवासी दिन

ब्रम्हपुरी/का.प्र.

येथील आदिवासी मुलांच्या शासकीय वसतिगृहात ९ ऑगस्ट रोजी जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवृत्त मुख्याध्यापक भगवान कन्नाके होते. कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून राजू भागवत, निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी तसेच तुलसीदास कुडमेथे, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख अतिथी म्हणून गोविंदराव ढगे, निवृत्त शिक्षक, गणेश सलामे, आदिवासी सामाजिक कार्यकर्ते, कैलास गोरकर तसेच वसतिगृहाचे गृहपाल सदाशिव नरताम उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यालयाचे कर्मचारी रोशन टेकाम , सूत्रसंचालन विद्यार्थी भाविक कुंभरे यांनी केले, तर ऋषभ कोल्हे यांनी उपस्थित मान्यवर, वसतिगृह कर्मचारी व विद्यार्थ्यांचे आभार मानले.

❀❀❀❀❀❀❀

# ब्रम्हपुरीत एमआयडीसी स्थापन करण्यासाठी योग्य ती कारवाई करू - उद्योगमंत्री नाम. उदय सामंत

## ब्रम्हपुरीच्या औद्योगिक विकासाला गती मिळणार!

ब्रह्मपुरी/का.प्र.

महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री मा. ना. डॉ. उदयजी सामंत यांनी १३ ऑगस्ट २०२६ रोजी ब्रह्मपुरी शहराला धावती भेट दिली. याप्रसंगी 'ब्रह्मपुरी जिल्हा निर्माण संघर्ष समिती'च्या वतीने डॉ. बाळकृष्ण शेळके यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने त्यांची भेट घेऊन ब्रह्मपुरी येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (MIDC) स्थापन करण्यात यावे, या मागणीचे सविस्तर निवेदन सादर केले.



निवेदनाची गांभीर्याने दखल घेत, 'ब्रह्मपुरीत एमआयडीसी स्थापनेसाठी शासनस्तरावर आवश्यक ती सर्व सकारात्मक कारवाई केली जाईल,' असे आश्वासन नामदार उदय सामंत यांनी शिष्टमंडळास दिले.

ब्रह्मपुरी हे ६ जिल्ह्यांतील (चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली, नागपूर, वर्धा) विद्यार्थ्यांसाठी मुख्य शैक्षणिक केंद्र आहे. मात्र, शिक्षण पूर्ण झाल्यावर स्थानिक पातळीवर रोजगार नसल्याने दरवर्षी शेकडो तरुणांना मोठ्या शहरांकडे स्थलांतर करावे लागत आहे. राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी द्रुतगती महामार्ग आणि रेल्वे कनेक्टिव्हिटीमुळे कच्चे व पक्के साहित्य वाहतूक करणे अत्यंत सोपे आहे. परिसरात भात प्रक्रिया उद्योग, वनसंपत्ती व खनिज संपत्ती मुबलक प्रमाणात उपलब्ध असून यावर आधारित सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) मोठ्या प्रमाणात उभारता येऊ शकतात. गडचिरोली व चंद्रपूरच्या सीमावर्ती भागातील तरुणांना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरेल.

निवेदन देतेवेळी सामाजिक कार्यकर्ते डॉ. बाळकृष्ण शेळके, हरिश्चंद्र चोले, दत्तू टिकले, अमित रोकडे, अंकज कानाझोडे, बंडू हजारे (जिल्हाप्रमुख, शिवसेना), नरेंद्र नरड (तालुकाप्रमुख, शिवसेना), रक्षित रामटेके, अमोल माकोडे, घनश्याम सूर्यवंशी, सुनील कुंभारे, दीपक वासनिक, जगदीश वासेकर, सुरज कोडापे, अनिकेत गोडबोले, अमोल ठिकरे यांसारखे परिसरातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री (महाराष्ट्र राज्य), पालकमंत्री (चंद्रपूर जिल्हा) आणि जिल्हाधिकारी (चंद्रपूर) यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

# व्यसनमुक्त जीवनात स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भविष्य घडवावे - रेवंत कदम



ब्रम्हपुरी/का.प्र.

'प्रत्येक व्यक्तीने व्यसनमुक्त आणि नशामुक्त जीवन जगणे हे आनंददायी आणि समाधानी जीवनासाठी महत्त्वाची बाब आहे. शालेय व किशोरवयीन विद्यार्थ्यांनी व्यसनापासून दूर राहावे. त्यांनी आपल्या अभ्यासाकडे व भविष्याच्या वाटचालीकडे लक्ष केंद्रित करून जीवनात पुढे जाण्यासाठी सतत प्रयत्नशील असावे', असे मत पोलीस उपनिरीक्षक रेवंत कदम यांनी मांडले.

ने. हि. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,ब्रम्हपुरी येथे आयोजित 'व्यसनमुक्ती, नशामुक्ती आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन' कार्यक्रमात ते मुख्य मार्गदर्शक म्हणून बोलत होते. विचारमंचावर अध्यक्षस्थानी प्राचार्य के. एम. नाईक, प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य ए.डब्ल्यू. नाकाडे तथा पर्यवेक्षक प्रा.पी.आर. जिभकाटे उपस्थित होते.

मुख्य मार्गदर्शक रेवंत कदम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना, अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम हे किती भयावह असतात हे निदर्शनास आणून देतांना व्यसनमुक्त जीवन हे व्यक्तिमत्व विकासासाठी किती महत्त्वाचे आहे हे समजावून सांगितले. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा उपयोग ज्ञानवृद्धी आणि सत्कार्यासाठी करावा, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना, प्राचार्य के. एम. नाईक यांनी 'मिशन ग्रॅज्युएशन'चा विचार करून विद्यार्थ्यांनी शालेय जीवनापासूनच भविष्यातील वाटचालीचे नियोजन करावे आणि व्यसनापासून दूर राहून भविष्यात इच्छाशक्ती आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्पर्धा परीक्षेत यश संपादन करावे, असे मत मांडले.

कार्यक्रमाचे संचालन ए.टी. बोधे यांनी केले तर अतिथींचे आभार व्ही.एन.वदनलवार यांनी मानले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षकवृंद, प्रशासकीय कर्मचारीवृंद उपस्थित होते.

# अड्याळ टेकडी येथे सावता महाराज पुण्यतिथी

ब्रम्हपुरी/का.प्र.

आत्मानुसंधान भुवैकुंठ अड्याळ टेकडी येथे संत सावता महाराज पुण्यतिथी सोहळा दि. ११ /८/२०२६ ला आनंदात व उत्साहात संपन्न झाला. मागील ५० वर्षाच्या पुर्वीपासुन ही पुण्यतिथी श्रीमती मालती प्रभाकर सुपले कुटुंब ब्रम्हपुरी याचें वतीने टेकडीवर साजरी करण्यात येते.

कर्मयोगी संत तुकाराम दादा गीताचार्य यांच्या निर्देशानुसार संत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेत वर्णन केलेल्या अनेक महात्मांची पुण्यतिथी विविध भाविक मंडळी यांच्याकडून टेकडीवर साजरी करण्यात येते. याप्रसंगी प्राचार्य जगनाडे , प्राचार्य पाटणकर, प्राचार्य कोकोडे, प्राचार्य गहाणे, प्रा. माधुरी कोकोडे, प्रा निकीता मिश्रा, प्रा विशाखा कांयदे, प्रा दिलीप जगनाडे, सिंग मॅडम, सयाम गुरूजी, भाष्करराव उराडे, तुळशीराम सपाटे, नंदु खुणे, नागोराव बेंदेवार, प्रा. जेंगठे, प्रा राहुल मोहुरले, विनोद चिंचेकर, गांधीनगरचे प्रार्थना मंडळ आदी मान्यवर उपस्थित होते.

### ... QUOTES ...

"I suppose leadership at one time meant muscles; but today it means getting along with people."

- Mahatma Gandhi

### चारोळी

आम्ही देशाला लुटतो  
तुम्ही परस्परांना लुटा...  
आम्ही 'जेब भरो' करतो,  
तुम्ही 'जेल भरो' करा...

रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल

# एनसीसी कॅडेट्सचा 'पिपींग सेरेमनी' थाटात संपन्न



ब्रह्मपुरी/का.प्र.

स्थानिक नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय, ब्रह्मपुरी येथे २० महाराष्ट्र बटालियन एनसीसी नागपूर अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी एनसीसी (आर्मी विंग) च्या कॅडेट्सचा 'रैंकिंग आणि पिपींग सेरेमनी' सोहळा अतिशय उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून रिटायर्ड मेजर विनोद नरड यांनी उपस्थित राहून कॅडेट्सना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाची सुरुवात २० महाराष्ट्र बटालियन एनसीसीचे केयर टेकर ऑफिसर प्रा. रेवनदास बोरकर यांच्या उत्कृष्ट व प्रभावी सूत्रसंचालनाने झाली. त्यानंतर एनसीसी अधिकारी कॅप्टन अभिजित परकरवार यांनी प्रास्ताविक सादर करून उपस्थितांचे स्वागत केले व पिपींग सेरेमनीचे महत्त्व स्पष्ट करून कॅडेट्सच्या कामगिरीचा आढावा घेतला. या सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी व शिस्तीच्या जोरावर निवड झालेल्या कॅडेट्सना रँक (पद) प्रदान करून सन्मानित करण्यात आले. यामध्ये सिनियर अंडर ऑफिसर अनुप माकडे, ज्युनिअर अंडर ऑफिसर यशवंत सेलोटे व समीक्षा उरकुडे याची निवड झाली.

प्राचार्य डॉ. एस. एम. शेकोकार आणि प्रमुख अतिथी मेजर विनोद नरड यांच्या हस्ते सर्व पदाधिकाऱ्यांना रँक्स लावून त्यांचे अभिनंदन करण्यात आले व पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांचे आभार कैडेट खुशी शिंगाडे हिने मानले. या सोहळ्यास महाविद्यालयातील प्राध्यापक, एनसीसी कॅडेट्स व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एलएमबी स्कुलच्या विद्यार्थ्यांचे JEE परिक्षेत यश


Mast. Ojas D. Nakade
JEE - 99.60%
IIT MANDI


Mast. Harish N. Dadmal
94.35%
IIT Rorkee

ब्रम्हपुरी/का.प्र.

शिक्षणाचा दर्जा उंचावत यशाची नवनवीन शिखरे गाठणाऱ्या एन. एच. एज्युकेशन सोसायटी संचालित एल. एम. बी. पब्लिक स्कुल ब्रम्हपुरी शाळेने दरवर्षीप्रमाणे यंदाही सीबीएसई १२ वी बोर्ड परिक्षेत आपला दबदबा कायम राखला असून त्यात ओजस डी. नाकाडे याने १२ वी मध्ये ९१.४० टक्के गुण मिळविले तसेच हरीश दडमल याने ८४.४० टक्के गुण मिळविले.

ओजस नाकाडे याला JEE Mains मध्ये ९९.६० टक्के गुण मिळवून जिल्हा टॉपर येण्याचा मान मिळविला असुन IIT (Mandi) हिमाचल प्रदेश येथे त्याची निवड झाली आहे. तसेच हरीश दडमल याने JEE Mains मध्ये ९४.३५ टक्के गुण मिळविले असुन IIT (Roorkee) उत्तराखंड येथे नियुक्ती झाली आहे.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या अतुल्य यशाबद्दल एन. एच. एज्युकेशन सोसायटीचे सचिव अशोक भैया सर, संचालिका आशिता भैया मॅडम, मुख्याध्यापक कादिर कुरेशी सर, उपमुख्याध्यापिका, पर्यवेक्षिका तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

N.B.H. Education Society's
NEVJABAI HITKARINI COLLEGE
BRAMHAPURI, DISTT. CHANDRAPUR (Ph.No. 272033 & 273293) (M.S.)
(Estd. 1962 & NAAC Re-accredited "B++' Grade (CGPA 2.87)
Estd. 1962

## Wanted Clock Hour Basis (CHB) Teachers
(For UG Level Grant Basis for Session 2026-2027)
Walk-in-Interview

As per permission of Hon. J D Letter No. उशिनाग/पदमा/सीएचबी/ना.ह.प्र./ई-3280061C/2026 दि. १२/०८/२०२६. The qualification and teaching remuneration shall be as per the terms and conditions laid down in GR Govt. of Maharashtra No. अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/माशि-३, दिनांक २७ मार्च २०२३.

| Sr. No. | Subject | No.of Posts | Date of Interview |
|---|---|---|---|
| 1 | Electronics | 02 | Dt. 21/08/2026 at 11.00 am |

Attend the Personal Interview at your own cost along with original and two sets of Xerox copies of Marklists and Certificates **on said date at 11:00 a.m.** in the office of the **Principal, N.H. College, Bramhapuri, Dist.- Chandrapur.**

Smt. Snehalatabai K. Bhaiya — President
Shri. Ashok K. Bhaiya — Secretary
Dr. S.M. Shekokar — Off. Principal

# पदवीधर नोंदणी, एसआयआरसह...

(पान क्र. १ वरून)

मतदार यादीचे पुनरावलोकन, पात्र मतदारांची नोंद, आवश्यक दुरुस्त्या तसेच नागरिकांमध्ये या प्रक्रियेबाबत जनजागृती करण्याच्या दृष्टीने कार्यकर्त्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे मार्गदर्शन करण्यात आले. पक्ष संघटनेच्या माध्यमातून ही प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी बूथस्तरापर्यंत नियोजन करण्यावर भर देण्यात आला. बैठकीदरम्यान रवींद्र चव्हाण यांनी चंद्रपूर जिल्ह्यातील कार्यकर्त्यांशी संवाद साधत संघटन हीच पक्षाची खरी ताकद असल्याचे सांगून कार्यकर्त्यांचा उत्साह वाढविला.

आगामी काळात पक्षाचे काम अधिक व्यापक करण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांने जनतेशी सातत्याने संपर्क ठेवावा, स्थानिक प्रश्न समजून घ्यावेत आणि पक्षाची भूमिका प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवावी, असे त्यांनी स्पष्ट केले.चंद्रपूर जिल्ह्यात भाजपा संघटना विविध स्तरांवर करत असलेल्या कामाचा आढावा घेताना आगामी कार्यक्रमांचे नियोजन, बूथस्तरीय संघटन मजबूत करणे, मतदारांशी सातत्यपूर्ण संपर्क आणि पक्षाच्या विविध अभियानांची प्रभावी अंमलबजावणी याबाबतही चर्चा झाली. वरिष्ठ नेतृत्वाच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीमुळे जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.या बैठकीस माजी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहीर, भाजपा प्रदेश महामंत्री डॉ. संजय कुटे, भाजपा प्रदेश उपाध्यक्ष आमदार श्री. संजय भेंडे, विदर्भ संघटन संयोजक श्री. दिनेश सूर्यवंशी, सहसंयोजक आमदार श्री. प्रवीण दटके, चंद्रपूर जिल्हा प्रभारी आमदार श्री. चैनसुख संचेती, चंद्रपूर महानगर प्रभारी अर्चना देहनकर, आमदार कीर्तिकुमार भांगडिया, आमदार देवराव भोंगळे, आमदार करण देवतळे, आमदार किशोर जोरगेवार, डॉ. अशोक जीवतोडे प्रदेश उपाध्यक्ष भाजपा ओबीसी मोर्च,माजी आमदार प्रा. अतुल देशकर यांच्यासह चंद्रपूर जिल्ह्यातील भाजपा नेते, खासदार, आमदार, जिल्हा व मंडल पदाधिकारी तसेच विविध आघाड्या व मोर्चांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजपा जिल्हाध्यक्ष श्री. हरीश शर्मा यांनी केले. त्यांनी जिल्ह्यातील संघटनात्मक कामकाजाचा तसेच विविध अभियानांच्या प्रगतीचा आढावा मांडला. कार्यक्रमाचे प्रभावी संचालन भाजपा जिल्हा उपाध्यक्ष साकेत भानारकर यांनी केले, तर ब्रह्मपुरी भाजपा अध्यक्ष डॉ. सुयोग बालबुधे यांनी उपस्थितांचे आभार मानले.प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनामुळे चंद्रपूर जिल्ह्यातील भाजपा संघटनेला आगामी काळातील कामासाठी स्पष्ट दिशा आणि कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाल्याचे चित्र या बैठकीत दिसून आले.

Miracle constructions & Developers

श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
- सिंदेवाही
- नवरगांव
- तळोधी
- चंद्रपुर (चौराळा)

संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
गीत (तुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.



स्वातंत्र्य दिन चिरायू हो

जल है तो कल है...


Lubi PUMPS-MOTORS
बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता

Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404